ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारताचे शेजारिल राष्ट्रांशी धारण

**प्रा. डॉ. प्रतिभा गडवे (दातीर)**
*असिस्टंट प्रोफेसर, राज्यशास्त्र विभागप्रमुख*
*बॅरि. शेषराव वानखेडे कला, वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा*

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत इंग्रजी नियंत्रणातून मुक्त झाला व पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताची परराष्ट्र निती ठरविण्यात आली. भारताचे परराष्ट्र धोरण म्हणजे स्वतंत्र भारताच्या विकासासाठी तयार केलेली ती एक विकास निती होती. आतंररष्ट्रीय क्षेत्रात मजबुतीने उभे राहुन, बाहेरील जगताशी जुळवून घेऊन आपला विकास साध्य व्हावा या दृष्टीने तयार केलेले ते एक विकासाचे प्रतिमान व संरक्षक चक्र आहे. असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही. आधुनिक जागतिकीकरणाच्या काळात जगातील कोणतेही राष्ट्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील घडामोडीपासून अलिप्त राहु शकत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सहजीवन जगण्यासाठी परराष्ट्र धोरणची निर्मिती करणे आवश्यक असते. मग भारत या वस्तुस्थिती पासून अलिप्त कसा राहील? प्राचीन काळापासून भारताचे परराज्यांशी संबंध राहिलेले आहे. हे अनेक तत्वज्ञ पंडीत व परकीय प्रवासी यांच्या लिखाणातून निदर्शनास येते. आज भारतीय परराष्ट्र धोरणाची जी तत्वे पहायला मिळतात. त्याच्या जडणघडणीची सुरवात स्थुलतः स्वातंत्र्य प्राप्ती पूर्वीच्या काळापासूनच झाली होती. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात नेहरूंनी अनेक आंतरराष्ट्रीय घडामोडींवर भाष्य करून त्यासंदर्भात भारतीय भूमिका स्पष्ट केली होती. अखिल भारतीय कॉग्रसने आतंरराष्ट्रीय प्रश्नासंबंधी वेळोवेळी जी भूमिका घेतली होती. त्या भूमिकेवर आधारितच भारतीय परराष्ट्र धोरणची तत्वे नंतरच्या काळात निर्माण झाालेली दिसून येतात. इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणाचा भारतीयांनी सुरवातीपासूनच तिरस्कारच केला व आपल्या साम्राज्यवादी लढयातून इंग्रजी सत्तेला माघार घ्यायला लावली. इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणाच्या केलेल्या विरोधातूनच भारतीय परराष्ट्र नितीतील साम्राज्यवादाला विरोध हे तत्व तयार झालेले आहे. 1928 मध्ये भारतीय कॉग्रसने परराष्ट्रीय धोरणासाठी स्वतंत्र विभाग सुरू केल्यापासून त्याची धुरा पं. नेहरू अखेरपर्यंत सांभाळात होते. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतीय संविधानाच्या कलम 51 मध्ये परराष्ट्रीय धोरणाच्या काही तत्त्वांचा स्वष्टपणे उल्लेख केलेला आहे. नेहरूंनी स्वीकारलेल्या परराष्ट्रीय धोरणाच्या तत्वांबाबत कोणत्याही नेत्यात मतभेद नव्हते. आजही भारताची विदेशनिती याच तत्वावर मार्गक्रमण करून यशस्वी होतांना दिसत आहे.

परराष्ट्र धारेण ठरवितांना मुख्यतः प्रत्येक राष्ट्र राष्ट्रीय हितसंबंधचा विचार करून काही जवळच्या टप्प्यातील तर काही दुरगामी उद्दीष्टे ठरवित असतो. दुरगामी उदद्ी" बदद्ल सर्व देशांच्या धोरणात जवळपास एकवाक्यता पहायला मिळते. देशाच्या सार्वमौमत्वाचे रक्षण, सीमांचे सरंक्षण, सुरक्षा जोपासणे, विकास आणि संपन्नता साधणे या दोन्ही दृष्टीने भारताचे परराष्ट्र धोरण निश्चितच योग्य वळणावर व दिशेने जाणारे होते प्रत्येक देशाचे परराष्ट्र धोरण ठरवितांना त्या देशाची परिस्थिती, इतिहास राजकिय व्यवस्थेला आलेले अनुभव असे अनेक घटक विचारात घेतले जात असतात. ज्यालाच की, परराष्ट्रधोरणाचे निर्धारक घटक संबोधले जाते आणि भारतही याला अपवाद नव्हताच. भारताचे भौगोलिक स्थान, इतिहास, आर्थीक परिस्थिती, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकिय व्यवस्था, ल" करी व्यवस्था, आंतरराष्ट्रीय व्यवस्था व मान्यवरांची मत या तत्वांनी प्रभावित होऊन भारतीय परराष्टधोरणाची तत्वे निश्चित झालेली आहे. जी अशी आपल्याला आजतागायत पहायला मिळतात. 1) अलिप्ततेचा स्वीकार, 2) वसाहतवाद, साम्राज्यवाद व वर्णभेदाला विरोध 3) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेवर भर 4) आफ्रिफा व आशिया खंडातील राष्ट्रांबरोबर मैत्रीचे संबंध 5) पंचशील तत्वांचा आदर 6) दोन्ही महासत्तांबरोबर मैत्रीचे संबंध 7) दक्षिण आशीयातील राष्ट्रांबरोबर मैत्रीचे संबंध 8) आंतरराष्ट्रीय संघटनांचे समर्थन. या प्रत्येक तत्वांची सुसंगती आधारभूत घटकांशी असलेली दिसुन येते. महाशक्तीच्या शीतयुध्दात आपले हितसंबंध सुरक्षीत ठेवण्यासाठी नेहरुनी जी दृष्टी वापरली ती निश्चितच वाखणण्याजोगी होती. अलिप्ततेच्या धोरणाचा स्वीकार केल्यामुळेच भारताला आजपर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका पार पाडता आली. शीतयुध्दांचा आज जरी अंत झाला असला तरी केवळ या तत्वांमुळे भारत आज जगात आपली वेगळी ओळख व दबदबा राखून आहे. अशांतता आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेवर भारताने दिलेला भर निश्चित स्पृहणीय आहे. युध्द हे विकासासाठी घातक ही बाब ओळखून भारताने स्वीकारलेले वसाहतवाद, साम्राज्यवादाला विरोध भारताच्या मानवीय दृष्टीकोनाचा परिचय करुन देते. नवोदित स्वतंत्र झालेल्या आशिया व आफ्रीका सोबत भारत विशेष सहकार्य करु इच्छीत होता कारण भारतासारखी ही राष्ट्र प्रदिर्ध काळापर्यंत गुलामगिरीत होती. त्यामुळे आपल्या मनाविरुध्द या राष्ट्रांना केवळ राजकीय मागसलेपणामुळे शीतयुध्दात सामील असलेल्या बडया राष्ट्रांकडे झुकण्यास भाग पडू नये, त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेऊन अलिप्त गटात समील असलेल्या राष्ट्रांची संख्या वाढवून त्यांना राजकीय दृष्टया शिक्षित करणे, त्यांच्यात ऐक्य निर्माण करणे त्यामुळे ते निर्भिडपणे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तर उभे रहाणारच होते. पण त्यामुळे अलिप्ततावादी गटात सामील राष्ट्रांची संख्या वाढल्यास मदत होणार होती.

तसेच शेजारील राष्ट्रे, जागतिक राजकारणातील महाशक्ती यांच्यासोबत भारताच्या असलेल्या संबंधाचा आढावा घेतल्याशिवाय भारताचे परराष्ट्रधोरण पूर्णत्वास येत नाही.

कोणत्याही परराष्ट्र धोरणाचे मुख्य हित व उददीष्ट आपले राष्ट्रीय हित साध्य करणे हे असते. राष्ट्रीय सुरक्षेचा दृष्टीने अधिक जागरूक व प्रयत्नशील राहणे अतिशय गरजेचे असते. कारण परराष्ट्रीय धोरणाला योग्य दिशा दाखविण्याचे काम राष्ट्रीय सुरक्षितता करित असते. राष्ट्रीय सुरक्षिततेचा प्रश्न जेव्हा निर्माण होतो. तेव्हा शेजारील राष्ट्रांशी आपले संबंध करणे आहेत, कसे रहावेत याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक असते. जेव्हा आपण भारतीय परराष्ट्रधोरणाचा निणीयक तत्वांचा विचार करतो. तेव्हा भारताचे शेजारी राष्ट्रांशी असलेल्या संबंधाचे अध्ययन केल्याशिवाय पररा" ट्रधोरणाचा अभ्यास पूर्ण होत नाही. त्याअनुशंघाने भारत व शेजारी राष्ट्रांचा पुढीलप्रमाणे विचार आपणास करावाचा लाागेल की ज्यामुळे आपले अलिप्ततावादाचे धोरण प्रभावित झाले आहे.

**भारत व शेजारो राष्ट्रे**

भारत हा दक्षिण आशीयातील सर्वांत मोठा देश समजला जातो. भारताच्या शेजारील देशांमध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका व मालदीव यांचा समावेश होतो.

भारताचे शेजारील देशांशी संबंध सुरवातीपासूनच समानता व परस्परांचा आदर या मूलभूत तत्वावर आधारित आहे. शेजारील राष्ट्रांशी असणारे संबंध देशाच्या सामाजिक व गैरसामाजिक सुरक्षेला प्रभावित करत असतात.

काही राष्ट्रे राष्ट्रीय सुरक्षिततेच्या नावाखाली आपल्या राष्ट्रीय शक्तीत भरमसाठ वाढ करीत असतात. तेव्हा अश्या राष्ट्रांबद्दल शेजारील राष्ट्रांच्या मनामध्ये संशय व भीतीयुक्त वातावरण निर्माण होऊ लागते. तेव्हा जर सहजीवन जगायचे असेल तर शेजारील राष्ट्रांच्या मनातील हा संशय दूर करणे अत्यंत आवश्यक ठरते. ही बाब लक्षात घेऊन भारताने आपल्या शेजारीला राष्ट्राच्या मनात कोणतेही किल्मिश निर्माण होणार नाही असेल धोरण सुरवातीपासुन ठेवले. तरी देखील भारत स्वतंत्र झाला तेव्हापासुन पकिस्तान व चीनसारख्या राष्ट्रांनी त्यांच्याशी कितीही सलोख्याचे संबंध ठेवण्याचे प्रयत्न केले तरी पाठीत खंजीर खूपसून भारताची अशांतता कशी भंग करता येईल असेच आपले धोरण ठेवले होते एवढेच नव्हे तर ज्या राष्ट्रांची निर्मीतीच मूळी भारताच्या पाठिब्यांने झाली. त्या बांग्लादेशासारख्या राष्ट्रांने देखील भारतविरोधी कारवाया करण्याचे काम केलेले आहे.

भारतासारख्या देशाला पाकिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, बांगला देश, श्रीलंका, मालदीव व म्यानमार सारख्या राष्ट्रांच्या सीमा भिडलेल्या असल्याने यांना भारताची शेजारी राष्ट्रे म्हणून ओळखले जाते. वरील नमुद केल्याप्रमाणे भारत – पाकिस्तान या शेजारी देशांचे संबंध सुरवातीपासून बिघडल्या स्वरुपात पहायला मिळालेले आहे 1947–48, 1965, 1971 व 1999 या साली हल्ले करुन पाकिस्तातने भारताला खिळखीळे करण्याचा प्रयत्न केला परंतु यात त्याला फारसे यश आले नाही. भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंध बिघडल्यास सुरवातीपासुन काही मुदद् अग्रेसर राहीलेले आहे. ज्यावर आजही समाधानकारक तोडगा निघू शकला नाही. काश्मीर समस्या, नदीवरील बंधाऱ्याचा प्रश्न, अणुप्रश्न किंवा अणुसमस्या, पाकिस्तानकडून वारंवार सीमापार दहशतवादाला मिळणारे प्रोत्साहन याशिवाय सियाचीन हिमनदीचा प्रश्न, सरक्रिक प्रश्न, तुलबुल जलवाहतुक प्रकल्प, बाग्लियार जलविदयुत प्रकल्प अश्या अनेक प्रश्नांमुळे हे संबंध कायम चिघळले स्वरुपात पहायला मिळाले आहे. परंतु ल" करांच्या बळावर आपल्याला हे प्रश्न सोडविता येत नाही. हे पाहून घातपाती कारवायाच्या माध्यमातून अजुनही पाकिस्तानचे भारताला खीळ–खीळे करण्याचे प्रयत्न सुरु आहे.

भारत चीन संबंधाचा विचार करावयाचा झाल्यास हे ही संबंध नाजुकच आहे असे आपणाला म्हणावे लागते 1949 मध्ये साम्यवादी राजवट प्रस्थापित झालेला देश म्हणून जगात चीनची स्वतंत्र नाकेबंदी करण्याचे प्रयत्न चालु असतांना भारत हा सर्वप्रयम चीनला मान्यता देणारा व एवढेच नव्हे तर स्वतःबदल्यात संयुक्त रा" ट्रसंघाचे सभासदत्व मिळवून देणारा देश होता. परंतु उपकाराची काहीही भावना न ठेवता तिबेट गीळकृंत करुन भारताला शह देण्याचा प्रयत्न चीनने केलेला आहे. अरूणांचल प्रदेशात आपले सैन्य घुसवून सीमावाद निर्माण करण्याचा प्रयत्न चीनने सदैव चालु ठेवला आहे व आजपर्यंत निरनिराळया प्रश्नावरुन भारत – चीन हे संबंध वादाचेच असलेले दिसुन येते. थोडक्यात काय तर ' ोजारी राष्ट्रांचा संदर्भात केवळ भारताने शेजाऱ्यांबदद्ल मनात सद्भावना ठेऊ चालणार नाही तर तसे भाव शेजारी राष्ट्रांच्या मनात देखील निर्माण होणे आवश्यक आहे. पण याबाबत भारत दुर्देवीच राहीला असे आपणांस म्हणावे लागेल.

पंडित जवाहरलाल नेहरु तो आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालखंडापर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाची वाटचाल पाहील्यास शेजारील राष्ट्रांशी नेहमी सलोख्या प्रस्यापित करण्याचे प्रयत्न सुरवातीचे काळापासून झालेले आपणास पहावयास मिळतात पंडीत जवाहर लाल नेहरु यांच्या काळात चीनच्या संदर्भात त्यांच्या कपटनितीचा अनुभव येऊन ही भारताने आपले संबंध मात्र सलोख्याचे ठेवलेले दिसुन येतात लालबहादूर यांच्या काळात ताश्कंद करार करुन भारत – पाकिस्तान संबंध सामान्य करण्याचा प्रयास हा वाखणण्यासारखाच होता. इंदिरा गांधीच्या राजवटी तर शेजारधर्म पाळण्याचा खूप मोठा प्रयत्न बांगलादेशची निर्मिती करुन झाला. पुढे राजीव गांधी, नरसिंहराव राजवट, भारतीय जनता पक्ष, कॉग्रेस प्रणीत आघाडी सरकार या कालखंडातही ' ोजारी राष्ट्रांसोबतचे भारतीय संबंध सुधारावेत असेच प्रयत्न राज्यकर्त्याकडुन झालेले दिसतात. आधुनिक काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांकेतिक राजनय व

शिष्टाचारापलिकडे जाऊन भारताचा 'नेबरहूड फर्स्ट' या धोरणाचा स्वीकार केलेला आहे. क्षेत्रफळाने, लोकसंख्येने, सैन्यशक्तीच्या बाबतीत मोठया नसलेल्या मालदीवसारख्या आकाराने लहान शेजाऱ्यांशी सहकार्य साधण्यासाठी आणि परस्परांच्या आर्थिक व सामाजिक उत्कर्षासाठी भारतीय संसाधने वापरली जातील याची हमी भारताने दिली आहे. तसेच SAGAR -Security and Growth For all in the Region या धोरणाअंर्तगत भारत हिंद महासागर क्षेत्रातील सर्वच शेजाऱ्यांना भारताकडून आदरपूर्वक वागणूक मिळेल. तसेच भारत क्षेत्रातील सर्वांच्याच सुरक्षेचा विचार करेल आणि भारताचे हे धोरण म्हणजे आंतरराष्ट्रीय सागरी कायदयाचे पालन न करणाऱ्या चीनच्या विस्तारवादाला एक शह आहे. असेच म्हणावे लागेल, मालदिवसारख्या छोटया राष्ट्रांना भारतीय पंतप्रधानाने भेट देणे हे भारत शेजारी राष्ट्रांशी सहकार्य व आदराने पाहू इच्छितो याचे दयोतक आहे.

भारताच्या सध्याच्या नेबरहुड फर्स्ट या धोरणाने वेग घेण्याचे महत्वाचे कारण म्हणजे सध्या दक्षिण आशियातील श्रीलंका , बांग्लादेश , भूतान आणि मालदीव या देशांमध्ये सध्या भारतीय राज्याला व धोरणला अनुकूल असे राजकीय पक्ष व नेते सत्तेत आहे. या शेजारी राष्ट्रांशी भारताचे सहकार्य नक्की वाढले आहे. कारण हे देश केवळ भारताचे शेजारी नसून त्यांच्या व भारताच्या समस्या हया बहुतेक सारख्या आहेत. व हा दुवा त्यांना जवळ आणण्यास कारणीभूत ठरला आहे. पाकिस्तान व भारताला पारंपारिक दृष्टया जरी सर्वात जवळचा शेजारी असला तरी पाकिस्तानशी असलेले तणावपूर्ण संबंध हा आजही भारतासमोरील कळीचा मुद्दा आहे. पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादाविरूद्ध विश्वासार्ह कामगिरी करत नाही तोपर्यत पाकिस्तानशी चर्चा होणार नाही ही आपली भूमिका भारताने स्पष्ट केली आहे. त्यामुळे ''शांघाय – को ऑपरेशनच्या बैठकीत भारत – पाकिस्तानचे द्विपक्षिय चर्चा होणार नसल्याचे भारतीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. सध्या तरी असेच म्हणावे लागेल की भारताचा शेजारधर्म हा पाकिस्तानला वजा करून ठरलेल्या शेजाऱ्यांसाठी अहे. मालदिवच्या राष्ट्रपतींनी 'इंडिया फर्स्ट' धोरणाची मजलिसमध्ये केलेली घो" ाणा ही भारताच्या 'नेबरहूड – फर्स्ट ' धोरणाचे यशच मानावे लागेल. आजच्या या परराष्ट्र धोरणाचे यश काही वर्षांनी जगाच्या दृष्टीस येईल असे म्हणावे लागते.

आज भारताने परराष्ट्र निर्णायक वळणावर उभे असलेले दिसून येते. केवळ सुरक्षाविषय आपली भूमिका बाजूला सारून नव्या जागतिक संरचनेत भारताला अधिक व्यापक भूमिका वठवण्याची संधी आहे. आणि त्यासाठी भारताला आदर्शवादी संकल्पनांच्या जोखडातून बाहेर पडून वास्तवाची कास भारताने धरायला हवी. आज जग कोविड सारख्या माहामारीतून जात आहे. व या कोविड चा उगम चिनसारख्या देशातून झाल्याने जवळपास मान्य झाले आहे. कोविडच्या परिस्थितीचा लाभ घेत चीनसारखे राष्ट्र शेजारी राष्ट्रांशी असलेल्या सीमावादाबाबत आक्रमक भूमिका घेत आहे. अशावेळेस जागतिक जनमत चीनच्या विरोधात जाऊन त्याला धडा शिकविण्याचा प्रयत्न करित असतांना भारतानेही आपली मवाळ भूमिका चीनबाबत सोडून जागतिक संरचनेत सामील होणे आवश्यक आहे. तेव्हा आदर्शवाद सोडून भारताने वास्तववादाची कास सोडणे अत्यंत आवश्यक आहे. व गेल्या काही वर्षात भारतीय परराष्ट्रधोरण वास्तववादी होतांना दिसतही आहे. याचेच उदाहरण म्हणजे भारताने इस्त्रासयलशी असलेल्या संबंधंना अधिकृत दिलेली मान्यता परराष्ट्रधोरण हे मूलतः आर्थिक – व्यापारी व संरक्षणविषयक हितसंबंधातून आकाराला येत आहे. या दोन्ही आघाडयांवर भारत आज निर्णायक वळणांवर उभा आहे. निर्णय घेतांना तो विचाारपूर्वक घेणे व तो निर्णय घेतला की, अनेक आघाडयांवर युध्दपातळीवर कामाला लागणे, व असे करतांना फुकाच्या आदर्शवादी संकल्पनाच्या जोखडातून देशाला बाहेर काढण्याबरोबरच वास्तावाची कास धरणे हे भारतीय परराष्ट्र–धोरणेसमोरचे फार मोठे आव्हान असणार आहे.

## संदर्भ सूची

1. *तोडकर बी. डी. डॉ. प्रा. – 'भारत आणि जग', डायमंड पब्लिकेशन – 1255, सदशित पेठ, लेले संकुल, निंबाळकर तालमीसमोर, पुणे – 411030*
2. *सहस्त्रबुध्दे उत्तरा, पेंडसे अरुणा – आंतरराष्ट्रीय संबंध शीतयुध्दोत्तर व जागतीकिकरणाचे राजकारण'' ओरिएन्ट लॉगमन प्रायव्हेट लिमिटेड (2008) रा. कामाणी मार्ग, बंलार्ड इस्टेट, मुंबई – 400001*
3. *वाघ एस. एम. डॉ. – भारत (शेजारील रा" ट्रे आणि पराष्ट्र धोरण) अथर्व पब्लिकेशन्स*
4. *loksatta.com. https://www.kiksatta.com7upsc*
5. *https://marathi.thewire.in>bhartach..... .भारताचे 'नेबरहुड फर्स्ट' परराष्ट्रधोरण*
6. *https://www.orfonline.or0>marathi भारताचे परराष्ट्रधोरण निर्णायक वळणावर*